केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा (प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व शिक्षक शिक्षण) उपयोजनेचा सर्वसाधारण (General) घटकातील 1st Mother Sanction निधी वितरित करणेबाबत. (केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा).

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक:- समग्र-२०२६/ प्र.क्र. २५० (ई- १८०२२७५)/ एसडी-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

४ था मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- १४ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

(१) राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. मप्राशिप/ लेखा शाखा/ SAMAGRA-Mother Sanction/ २०२६-२७, दि. १२.०८.२०२६

(२) केंद्र शासनाचे आदेश क्र. एफ क्र. १०-५/२०२६-SS.१, दि. १२.०८.२०२६.

(३) केंद्र शासनाचे आदेश क्र. एफ क्र. १२२/ IFD/ २०२६-२७/ MH,दि.१०.०८.२०२६.

(४) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ दि.०९.०४. २०२६ व दि. ०७.०५.२०२६.

(५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४ दि.३० जुलै, २०२५.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात समग्र शिक्षा योजनेच्या सर्वसाधारण (General) व SAP या घटकाकरिता केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिस्सा वितरित व खर्च करावयाचा आहे. याकरिता केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ येथील आदेशान्वये 1st Mother Sanction रु. ३९२१२.९ लाख इतका निधी वितरित केलेला आहे. केंद्र शासनाने वितरित केलेला निधी व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा निधी वितरित करण्याची विनंती राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी संदर्भ क्र. १ अन्वये केली आहे.

समग्र शिक्षा योजनेच्या सर्वसाधारण (General) व SAP या घटकाखाली केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिस्स्याकरिता वितरित व खर्च करावयाची तरतूद उपलब्ध आहे. त्यानुषंगाने वित्त विभागाने दि.०९.०४.२०२६ व दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार समग्र शिक्षा योजनेंतर्गत सन २०२६-२७ या वर्षात सर्वसाधारण (General) या उपयोजनेचा केंद्र हिस्सा (६०%) २२०२ आय ६१२ या लेखाशीर्षाखाली रु. ३९२१२.९ लाख इतका निधी तसेच सदर निधीच्या समरूप राज्य हिस्सा (४०%) २२०२ आय ६१२ या लेखाशिर्षाखाली रु. २६१४१.९३ लाख असा एकूण रु. ६५३५४.८३ लाख इतका निधी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाने उपरोक्त प्रमाणे उपलब्ध करून दिलेला निधी खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडे समग्र शिक्षा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ येथील वितरित करावयाची तरतूद ही स्तंभ क्र. २ येथील लेखाशीर्षाकरीता मंजूर असलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात यावी.

(रक्कम रूपये-लाखात)

अ.क्र.	**लेखाशीर्ष**	**सन २०२६-२७ या वर्षातील अर्थसंकल्पिय तरतूद**	**वितरित करावयाची तरतूद**
मागणी क्रमांक:- ई-२			
१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६- शिक्षक व इतर सेवा, (००) (०२) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (केंद्र हिस्सा ६० टक्के), (२२०२ आय ६२१), ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	८८८६१.९१	३७९६९.३२
२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६- शिक्षक व इतर सेवा, (००) (०२) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (राज्य हिस्सा ४०टक्के), (२२०२ आय ६१२), ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर).	६९२४१.२८	२५३१२.८८
३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६- शिक्षक व इतर सेवा, (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण), (केंद्र हिस्सा ६० टक्के), (२२०२ आय ६२१), ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान.	३८८७१.१६	१२४३.५८
४	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६- शिक्षक व इतर सेवा, (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण), (राज्य हिस्सा ४० टक्के), (२२०२ आय ६१२), ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान.	१०७५८.६३	८२९.०५

२. सदर अनुदान सशर्त अनुदान असुन यापूर्वी वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे. या अनुदानाच्या अटी व शर्ती या शासन निर्णयात नमूद केल्या आहेत.

३. सदर निधी सायबर कोषागार कार्यालयामार्फत (कोषागार संकेतांक-८१०१) आहरित करण्यासाठी

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. समग्र-२०२५/प्र.क्र.१४५/एसडी-१ दि. ०९.०९.२०२५ व शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२४२५/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प (ई-१३४७२००), दि. १९.०९.२०२५ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच देयके आहरण व संवितरण करण्याकरिता उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना “आहरण व संवितरण अधिकारी” घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावित निधी आहरित व वितरित करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करावे.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी केंद्र शासनाचे दि. १०.०८.२०२६ व दि. १२.०८.२०२६ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या निर्देशांनुसार व सन २०२६-२७ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक प्रकल्प मान्यता मंडळाने (PAB) मंजूर केलेल्या समग्र शिक्षा योजनेच्या चालू योजनांच्या आवर्ती / अनावर्ती बाबींसाठी खर्च करावा. आवर्ती व अनावर्ती बाबींचा सविस्तर तपशील सोबत **परिशिष्ट "अ"** येथे जोडला आहे.

५. वित्त विभागाचे दि. ०९.०४.२०२५ व दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या परिपत्राकान्वये दिलेल्या सूचनांनुसार तसेच खर्चासंबंधीच्या सध्याचा शासकीय धोरणास अनुसरून मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी.

६. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०९.०४.२०२६ व दि. ०७.०५.२०२६ रोजीचे परिपत्रकामधील सूचनांनुसार तसेच खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि. ०९.०४.२०२६ व दि. ०७.०५.२०२६ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१४१२१२५९७९४९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA
AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD,
2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB3008906
9836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E
37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.14 12:14:11 +05'30'

(अनिरुध्द कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. अध्यक्ष / सभापती, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
८) मा. विधान सभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई (सर्व).
९) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०) . आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/ २, मुंबई/ नागपूर.
१३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१५) सह सचिव/ उप सचिव (व्यय-५/ अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सह सचिव/ उप सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अवर सचिव/ कक्ष अधिकारी (लेखाशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२०) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हा परिषद.
२१) सर्व वरीष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण विभाग),
२२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
२३) निवडनस्ती (एसडी-१).

शासन निर्णय क्रमांक:-समग्र-२०२६/प्र.क्र.२५० (ई-१८०२२७५)/एसडी-१, दि.१४.०८.२०२६ सोबतचे

"परिशिष्ट-अ"

केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा (प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व शिक्षक शिक्षण) उपयोजनेचा सर्वसाधारण (General) व SAP या घटकाचा 1st Mother Sanction निधीचे आवर्ती व अनावर्ती बाबींनुसार तपशील:-

अ.क्र.	बाब	केंद्र शासन आदेश दिनांक	आवर्ती		अनावर्ती		SAP (आवर्ती)		एकूण
			केंद्र	राज्य	केंद्र	राज्य	केंद्र	राज्य	
१	प्राथामिक शिक्षण (अ)	१२.०८.२०२६	३२६८१.०७	२१७८७.३८	१२४३.५८	८२९.०५	१५१९.७३	१०१३.१५	५९०७३.९६
२	माध्यमिक शिक्षण (ब)	१२.०८.२०२६	३३१७.६५	२२११.७७	०	०	१०२.९	६८.६०	५७००.९२
३	शिक्षण शिक्षण (क)	१२.०८.२०२६	३४७.९७	२३१.९८	०	०	०	०	५७९.९५
एकूण (अ+ब+क)			**३६३४६.६९**	**२४२३१.१३**	**१२४३.५८**	**८२९.०५**	**१६२२.६३**	**१०८१.७५**	**६५३५४.८३**

ANIRUDDHA AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB3008906 9836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E 37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.14 12:14:41 +05'30'

(अनिरुध्द कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन